# सरकारच्या योजना घरोघरी पोहोचवणे गरजेचे

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे प्रतिपादन डिचोलीत विविध मंजुरीपत्राचे वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ५ :** राज्यातील अनुसूचित जाती – जमातीतील बांधवांनी मुख्य प्रवाहात यावे, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. सरकारने अनुसूचित जमाती वित्त आणि विकास महामंडळाच्या सहकार्याने वेगवेगळ्या योजना माफक दरात उपलब्ध केल्या आहेत. अनुसूचित जमातीत हिंदूंबरोबर काही ख्रिश्चन बांधव असून प्रत्येक घरात ही योजना पोहोचून शिक्षण व व्यवसायाच्या माध्यमातून त्यांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.




**सुर्ला : जागृती शिबिराचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, प्रेमेंद्र शेट, वासुदेव गावकर, सईमा गावडे व गोपाळ सुर्लीकर.**

गोवा राज्य अनुसूचित जाती जमाती वित्त आयोग विकास महामंडळातर्फे सदर बांधवांसाठी विविध केंद्र व राज्याच्या योजना संदर्भात जागृती शिबिर तसेच वेगवेगळ्या योजनांच्या मंजुरी पत्रांचे वितरण करण्याचा कार्यक्रम सातेरी मंदिर बये सूर्ला येथे आयोजित करण्यात आला होता

यावेळी व्यासपीठावर मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट, जिल्हा पंचायत सदस्य गोपाळ सुर्लीकर, सरपंच साईमा गावडे, महामंडळाचे संचालक दशरथ रेडकर, अध्यक्ष वासुदेव गावकर, व्यवस्थापकीय संचालक दीपेश प्रियोळकर, संचालक विजय, स्थानिक पंच मान्यवर आदी उपस्थित होते.

आमदार प्रेमेंद्र शेट यांनी दुर्लक्षित घटकांच्या विकासासाठी सरकारने अनेक योजना आखल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच राज्यातील मुख्यमंत्री यासाठी सातत्याने कार्यरत आहेत. समाज बांधवांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. आज विकास प्रत्येकाच्या दारात पोहोचत असून अनुसूचित जाती– जमाती बांधवांनी त्याचा योग्यप्रकारे लाभ घेऊन आपला व आपल्या कुटुंबाचा उत्कर्ष साधावा , असे त्यांनी सांगितले.

यावेळी वासुदेव गावकर, गोपाळ सुर्लीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी विविध योजनांची माहिती देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात अधिकाऱ्यांनी महामंडळाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

यावेळी विविध योजनांच्या मंजुरीपत्रांचे वितरण मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते लाभार्थींना करण्यात आले.

पान १ वरून

## ट्रम्प टॅरिफमुळे जागतिक शेअर बाजारात मोठी घसरण

चर्चेनंतर व्यापार धोरण नव्याने विचारात घेण्याची गरज असल्याचे सांगितले. अमेरिकेच्या केंद्रीय बँकेचे (फेडरल रिझर्व्ह) अध्यक्ष जेरोम पॉवेल यांनी या नव्या शुल्क धोरणामुळे महागाई वाढू शकते आणि आर्थिक विकासाचा वेग मंदावू शकतो, असा इशारा दिला आहे. महागाई आणि संथ वाढ किती काळ राहील, हे सांगता येत नाही, असे पॉवेल यांनी नमूद केले. दरम्यान, ट्रम्प यांच्या घोषणेमुळे ॲपल आणि 'नायके ' यांसारख्या ग्राहक कंपन्यांचे शेअर्स मोठ्या प्रमाणावर घसरले आहेत. यासह, हेल्थकेअर आणि युटिलिटी क्षेत्रावरही परिणाम दिसून येत आहे. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणाचा भारतातील काही प्रमुख उद्योगांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते, स्मार्टफोन उद्योगाला मोठा फटका बसू शकतो. भारतातून अमेरिका निर्यात होणाऱ्या आयफोन उत्पादनाच्या कच्च्या मालावर शुल्क वाढल्याने त्याच्या किमती वाढू शकतात. हिरा आणि दागिन्यांच्या निर्यातीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे, कारण अमेरिकेच्या एकूण आयातीमध्ये भारताचा वाटा ३० टक्के आहे. तसेच, कापड उद्योग आधीच चीन आणि बांगलादेशकडून मोठ्या स्पर्धेला सामोरे जात असताना, नव्या दरांमुळे भारतीय निर्यातदारांसाठी आव्हान वाढू शकते. तथापि, भारताच्या औषध उद्योगाला या नव्या शुल्कांमधून वगळण्यात आले आहे. मात्र, भविष्यात अमेरिकेकडून काही विशिष्ट औषधांवर कर लावला जाण्याची शक्यता तज्ज्ञ वर्तवत आहेत. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे जागतिक मंदी येऊ शकते, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला आहे. गुंतवणूक बँक जेपी मॉर्गनचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ ब्रूस केसमन यांच्या मते, वर्षाच्या अखेरीस जागतिक मंदी येण्याची शक्यता ६० टक्क्यांवर पोहोचली आहे.

अर्थशास्त्रज्ञ लॉरेन्स समर्स यांनी अमेरिकन शेअर बाजारातील घसरणीवर चिंता व्यक्त करताना सांगितले की, ही घसरण कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे नाही, तर ट्रम्प यांच्या धोरणांमुळे झाली आहे. हे धोरण अतिशय धोकादायक आहे. यामुळे संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असून, आगामी काही आठवडे बाजारातील अस्थिरता वाढण्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.



**हरमल : खालचावाडा श्री देव नारायण देवस्थानची महिला समिती डावीकडून रिषा, प्रिया ,अध्यक्ष अर्चना खोर्जे, सारिका, निकिशा, (उभे) हर्षा, श्रीशा, राजेश्री व प्राप्ती .**

## नारायण देवस्थानच्या महिला समितीच्या अध्यक्षपदी अर्चना खोर्जे

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ५ :** खालचावाडा येथील श्री देव नारायण देवस्थानची सर्वसाधारण बैठक देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांच्या अध्यक्षतेखाली होऊन महिला समितीची निवड करण्यात आली.ह्या समितीच्या अध्यक्षपदी अर्चना अर्जुन खोर्जे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या समितीच्या पदाधिकारी उपाध्यक्ष प्रिया पेडणेकर, सचिव युविका गोकर्णकर, उपसचिव निकिशा खोर्जुवेकर, खजिनदार सारिका रेडकर, उपखजिनदार हर्षा गोकर्णकर, सल्लागार श्रींनी गोकर्णकर, उपसल्लागार राजेश्री घाटवळ तर सदस्यपदी प्राप्ती रेडकर,चेतना पेडणेकर, श्रीशा प्रभू, रिषा गोकर्णकर व निशिता दाभोलकर यांची निवड करण्यात आली.

दरम्यान, देवस्थानच्या अनेकविध उत्सव व कार्यक्रमात महिलांनी सहभाग घ्यावा तसेच अंगभूत कलागुणांचा विकास करावा. देवस्थान अंतर्गत दिवजोत्सव, महिलांचे नाटक व अन्य सणाचे महत्व लक्षात घेऊन महिलांनी सक्षम व्हावे, असे आवाहन अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी व्यक्त केले. यावेळी नूतन अध्यक्ष अर्चना खोर्जे यांनी सर्वांच्या सहकार्याबद्दल आभार मानले.

# छठा बेटा आणि बकरी नाटकांमधील प्रासंगिकता महत्त्वाची

**▶ प्रा.दीपक वरक यांचे प्रतिपादन ; आंबिये महाविद्यालयात विशेष व्याख्यान उत्साहात**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ५ :** उपेंद्रनाथ अश्क यांच्या छठा बेटा आणि सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या बकरी या नाटकांमधील प्रासंगिकता अत्यंत महत्त्वाची असून या प्रासंगिकतेमधूनच सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहाराचे अधिक आकलन होते, असे प्रतिपादन गोवा विद्यापीठातील हिंदी विभागातील सहायक प्राध्यापक दीपक वरक यांनी केले.

संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, विर्नोडा येथे आयोजित करण्यात आलेल्या उपेंद्रनाथ अश्क यांच्या छठा बेटा आणि सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या बकरी या नाटकांमधील प्रासंगिता या विषयावर बोलत होते.



**विर्नोडा : मुख्य मार्गदर्शक प्रा.दीपक वरक यांच्यासोबत हिंदी विभागाच्या विभागप्रमुख डॉ.अमृता डिंगे, डॉ. रंजिता परब, रतिका मांद्रेकर व विद्यार्थी.**

यावेळी हिंदी विभागाच्या विभागप्रमुख डॉ. अमृता डिंगे, व्याख्यानाच्या मुख्य संयोजक डॉ. रंजिता परब व प्रा.रतिका मांद्रेकर आदी मान्यवर उपस्थित होते. हिंदी विभागप्रमुख डॉ. अमृता डिंगे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मुख्य मार्गदर्शक प्रा. दीपक वरक यांचा परिचय पूर्वा शेटकर यांनी करून दिला. डॉ. रंजिता परब यांच्याहस्ते प्रमुख पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन मानसी देसाई यांनी केले. तर आभार जसमिता मोरुडकर यांनी मानले.

उपेंद्रनाथ अश्क यांच्या छठा बेटा आणि सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या बकरी या नाटकांमधून सामाजिक आदर्शांची मांडणी केलेली असून ही नाटके आपण वडिलाधाऱ्यांशी कसे वागावे याचे व्यवहारज्ञान देतात, असे प्रा.दीपक वरक आपल्या व्याख्यानात म्हणाले. वडिलधाऱ्या माणसांशी प्रेमाने वागावे, वडीलधाऱ्या माणसांची काळजी घ्यावी याची मांडणीही या दोन नाटकांत दिसते. असे प्रा.दीपक वरक यांनी सांगितले.

**प्रा.दीपक वरक यांचे मार्गदर्शन**

मुख्य मार्गदर्शक प्रा.दीपक वरक यांचे बहुमूल्य मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. विद्यार्थ्यांनी नाटकांच्यासंदर्भात त्यांना प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे त्यांनी दिली.

## बांदोडकर विद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा निकाल ९४ टक्के

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ५ : गोवा शालान्त मंडळाने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेतलेल्या बारावीच्या परीक्षेचा वेळगे येथील बाळकृष्ण बांदोडकर शैक्षणिक संस्थेच्या सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वाणिज्य शाखेचा निकाल ९४ लागला. गेल्या ४४ वर्षापासून उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम आहे. कला शाखेची सानिया बायेकर हिने ८७ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. तसेच वाणिज्य शाखेची सादिया तल्लीकोट हिने ८५ टक्के गुण मिळवून विद्यालयात दुसरा क्रमांक मिळवला आहे. विज्ञान शाखेची सानिका गावकर हिने ७८ टक्के गुण मिळवून तिसरे स्थान प्राप्त केले.

विद्यालयाच्या वाणिज्य शाखेतून ३२ पैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात विशेष श्रेणीत १, प्रथम श्रेणीत ४, द्वितीय श्रेणीत २१, उत्तीर्ण श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेतून सादिया तल्लीकोट हिने ८५ टक्के गुण मिळवून वाणिज्य शाखेत प्रथम स्थान प्राप्त केले. आश्वेक गावडे याने ७० टक्के गुण मिळवून दुसरे स्थान, तर सय्यद बागवन याने ६३ टक्के गुण मिळवून तिसरे स्थान प्राप्त केले.

कला शाखेतून ४० पैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात विशेष श्रेणीत ३,प्रथम श्रेणीत ४,द्वितीय श्रेणीत २६, उत्तीर्ण श्रेणीत १ विद्यार्थी उत्तीर्ण झाला. कला शाखेतून सानिया बायेकर हिने ८७ टक्के गुण मिळवून प्रथम स्थान, प्रज्योती पिळयेकर हिने ७६ टक्के गुण मिळवून दुसरे स्थान तर सानिका वळवईकर हिने ६८ टक्के गुण मिळवून तिसरे स्थान प्राप्त केले. विज्ञान शाखेत ४४ पैकी ३५ उत्तीर्ण झाले. यातून विशेष श्रेणीत ३ ,प्रथम श्रेणीत ७,द्वितीय श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेतून सानिका गावकर हिने ७८ टक्के गुण मिळवून प्रथम स्थान, सायली मडकईकर ही ७५ टक्के (गुण मिळवून दुसरे स्थान, तर श्रेयस फडके याने ७५ टक्के गुण मिळवून तिसरे स्थान प्राप्त केले. लक्षिता आनंद गावडे ही सीडब्ल्यूएसएनमधून ४७५ गुण मिळवून विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाली.

विद्यालयाचा उत्कृष्ट निकालाबद्दल संस्थेचे अध्यक्ष यतीन काकोडकर,संस्थेचे व्यवस्थापक सुबिमल दास, विद्यालयाचे, प्रभारी प्राचार्य उदय मांद्रेकर,पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष घनश्याम कदम,पालक शिक्षक संघाच्या सर्व कार्यकारणी समितीने शिक्षकांचे,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# 'सावयवेंरेचो सख्याहरी' राज्यात अव्वल

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. ५ :** येथील सावयवेरेचो सख्याहरी या संस्थेने राज्यस्तरीय शिमगोत्सवातील लोकनृत्य स्पर्धांत सहभाग घेत आठ ठिकाणी सर्वाधिक प्रथम बक्षिसे प्राप्त करून यंदा राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. आठ प्रथम बक्षिसांसह सहा ठिकाणी द्वितीय बक्षिसे तर दोन ठिकाणी तृतीय बक्षिसे मिळवून तब्बल १६ बक्षिसांचे मानकरी ठरले आहेत. गतवर्षीही त्यांनी एकूण १७ बक्षिसे पटकावली होती.

ही संस्था दरवर्षी धनगर समाजातील पारंपरिक धनगर लोकनृत्य सादर करीत आहे. यंदा या संस्थेच्या कलाकारांनी लय, ताल, सूर व आकर्षक वेशभूषा यांच्या सुंदर मिलनाची प्रचिती देत उत्कृष्टरित्या धनगर नृत्य सादर करून गोमंतकीय उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. यंदा या लोकनृत्य पथकात एकूण ८० कलाकार सहभागी झाले होते. विशेष म्हणजे या पथकात युवा तसेच विद्यार्थी कलाकारांचा समावेश असून सावईवेऱ्यातील युवा पिढी पारंपरिक लोककलांचा प्रचार आणि प्रसार करीत आहेत. 'हर बोले हर बोले' च्या गजरात ढोल – ताशांच्या निनादात पारंपरिक नृत्याने अवघी गोमंतकीयनगरी दुमदुमली.



या संस्थेच्या कलाकारांनी गोव्याबाहेरील उदयपूर, जयपूर, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादी ठिकाणी गोमंतकीय विविध लोककला प्रकार सादर करून वाहवा मिळविली आहे. याशिवाय युवा महोत्सव व राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेतही भाग घेतला आहे. वर्षांची श्रव्या शेट वेरेकर हिने भाग घेत ती आकर्षणाची केंद्रबिंदू ठरली आहे. यंदा या संस्थेने मडगाव, डिचोली, कलंगुट , पणजी , कुकंळ्ळे , पेडणे, शिरोडा व मांद्रे या ठिकाणी प्रथम, कुडचडे, वास्को, म्हापसा, धारबांदोडा, वाळपई व साखळी याठिकाणी द्वितीय तर फोंडा व केपे याठिकाणी तृतीय बक्षिसे पटकावली आहेत.

# आमोणेत गरजू महिलांना घराच्या चाव्या हस्तांतरित

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ५ :** आमोणे, येथील दोघा गरजूं महिलांना श्री बलराम चॅरिटेबल ट्रस्टच्या संकल्पनेअंतर्गत शनिवारी सभापती रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांच्याहस्ते घराच्या चाव्या शालिनी देईकर व माधुरी मधुकर देईकर यांना हस्तांतरित करण्यात आल्या.

यावेळी पुणे येथील शिवाजी सावंत, दक्षिण गोवा भाजप उपाध्यक्ष महेश नाईक, मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर, सरपंच सविता तवडकर, संतोष नाईक गावकर व नारायण देसाई, अजित पैंगीणकर, बर्नाद फेर्नांडिस, देविदास गावकर व अन्य उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक म्हणाले की, रामनवमी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज दोघांत गरजूंना स्वतःचे हक्काचे घर सभापती तवडकर यांच्या प्रयत्नातून प्राप्त होत आहे, ही खरोखरच कौतुकास्पद गोष्ट आहे. हे पूर्वी ऐकून होतो, आजच्या घडीला हे प्रत्यक्षात आणणे फारच कठीण काम. मात्र सभापती रमेश तवडकर यांनी हे शक्य करून दाखविले आहे. भाजप सरकार अंत्योदय तत्वावर काम करीत आहे. समाजातील या घटकाना अन्न, वस्त्र व निवारा देऊन त्यांचे जीवनमान सुधारत आहे. या पक्षाला बळकटी देणे आपले कर्तव्य ठरते. असे प्रदेशाध्यक्ष नाईक शेवटी म्हणाले. सुरुवातीला सरपंच सविता तवडकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले व शेवटी त्यांनीच आभार मानले.

Office of the Village Panchayat
**Sernabatim, Vanelim, Colva & Gandaulim**
Salcete - Goa Pin Code 403 708
Ph: 0832-2788485
Email: vpcolva@gmail.com www:colvapanchayat.in
**Ref. No.: VP/SVCG/** **Date: 05-04-2025**

**TENDER NOTICE**
(e-tendering mode only)
Tender notice ref No:- VP/SVCG/25/2025-2026 dated: 02/04/2025

**TENDER SCHEDULE**
1. The last date of online application and submission of tender for serial number 1 is 15/04/2025 upto 4:00 pm.
2. Tender online will be opened at 12:00 noon on 16/04/2005 in the office Village Panchayat Colva, Salcete Goa.

For detailed tender notice and participating in e-tender, please visit website: https://eprocure.goa.gov.in

Sd/- **(SUZIE FERNANDES)**
Sarpanch

**CHANGE IN NAME**

I, **Simra Rashid,** R/o H. NO. House no. 04, ward no 04, village qutub chapra data nagar, Harihans, Siwan, Bihar 841286, has changed my name from Semrah Rashid to Simra Rashid to produce in School. Hereafter in all my dealings & documents I will be known by my name Simra Rashid.

Sd/- **Simra Rashid**

**VILLAGE PANCHAYAT OZARIM, OZARIM PERNEM-GOA**

Ref. No. V.P./OZARIM/PER/TEN-NOTICE/2024-25/ 941 **NOTICE INVITING TENDER** Date: 27/03/2025

The Sarpanch of Village Panchayat Ozarim invites sealed Percentage rates tenders from the eligible contractors from the approved list for execution of below mentioned works.

| Sr. No. | Name of the Work | Estimate Cost (excluding GST) | EMD | Time Limit Excl. monsoon | Class & category of Contractor As per new registration | Cost of Tender Form |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Providing of Iron sheets and channels to Kaloba Devasthan in Ward No.3 at Gothanwada, Ozarim, Pernem – Goa | 128987.68 | 2580.00 | 90 days | V and above BLDGS | 4000.00 |
| 2 | Repair & Re- construction of Drinking Water well in ward No. 1 at Sangavwada, Ozarim, Pernem – Goa. | 80272.13 | 1605.00 | 90 days | V and above BLDGS | 2000.00 |

**TERMS AND CONDITIONS:-** **1.** The details of the works can be having from E.O.R.E. in the Office of B.D.O. Pernem Goa and Office of the Village Panchayat Ozarim. **2.** The last date of submitting application for issue of tender form **15/04/2025 upto 12.00 Noon. 3.** The date of issue of the tender form is **16/ 04/2025 up to 12.00 Noon. 4.** The Contractor should submit complete & sealed tender along with EMD in the form of DCR/Demand Draft in respect sealed envelope in favor of V.P. Ozarim on **19/04/2025 up to 12.00 Noon** and Sealed tenders forms shall be opened on **19/04/2025 at 12.30 P.M.** in the presence of Contractor. If any. **5.** The eligible contractors should produce certified/ attested copy of valid Contractor license, Income tax Clearance Certificate, GST Clearance Certificate & acknowledgement of undated filed return with ANR, declaration of work in hand with details list & indication their present status, Pan Card copy, while submitting the application forms in persons. **6.** Unsealed and conditions tenders will be rejected outright. **7.** The Panchayat reserved the right to reject/accept any or all tenders without assigning any reason thereof.

Seal Sd/- ( Shri. Anil V. Shetye ) Sarpanch, Village Panchayat Ozarim

# केरी–सत्तरीत 'गुढी संस्कृतीची' कार्यक्रम उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ५ :** सार्वजनिक गुढीपाडवा उत्सव समिती केरी–सत्तरीतर्फे गुढी पाडव्यानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही 'गुढी संस्कृतीची' कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दरम्यान, यानिमित्ताने सकाळी केरी सरकारी माध्यमिक विद्यालयाच्या मैदानाकडून दुचाकीवरून केरी पंचायत क्षेत्रात मंगलफेरी काढण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांच्या उपस्थितीत अंकिता व रणजित पाटील यांच्या यजमानपदाखाली व अभय किंजवडेकर यांच्या पौरोहित्याखाली शास्त्रोक्त पद्धतीने 'सार्वजनिक गुढीरोहण सोहळा' झाला. त्यानंतर संध्याकाळच्या सत्रात लोकमान्य मल्टिपर्पज बँक केरी ते सरकारी हायस्कूल केरीपर्यंत श्री तोणयेश्वर शिमगोत्सव मंडळ साखळीतर्फे रोमटामेळ सादरीकरण व लहान मुलांचे वेशभूषा सादरीकरण झाले. मिरवणुकीत केरी पंचायतक्षेत्रातील प्राथमिक विद्यालयांतील विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक वेशभूषा सादर केल्या. मुलांनी मोठ्या संख्येने यात भाग घेतला होता.




**केरी : सार्वजनिक गुढीपाडवा उत्सव समितीच्या वेशभूषा सादरीकरणात सहभागी विद्यार्थ्यांसोबत सरपंच सुप्रिया गावस, गुरुदासबुवा सुतार, उपसरपंच उस्मान सय्यद, समितीचे अध्यक्ष सूर्यकांत माजिक व सचिव राघोबा पेडणेकर.**

दरम्यान रोमटामेळाची मिरवणूक सरकारी माध्यमिक विद्यालय केरी–सत्तरीच्या मैदानावर पोहचल्यावर व्यासपीठ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून केरी ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया गावस, प्रमुख वक्ते म्हणून शिक्षक, नाट्य कलाकार व कीर्तनकार ह.भ.प.गुरुदासबुवा सुतार, केरीचे उपसरपंच उस्मान सय्यद, सार्वजनिक गुढी पाडवा उत्सव समितीचे अध्यक्ष सूर्यकांत माजिक, सचिव राघोबा लवू पेडणेकर, खजिनदार रोवेश शेलार यांची उपस्थिती होती.

यावेळी गुरूदास सुतार यांनी शके नववर्ष आणि त्या संबंधीच्या हिंदू धर्माच्या परंपरा यावर मार्गदर्शन केले.

गुरुदास सुतार म्हणाले की, गुढी ही नावीन्याचे, संस्कृतीचे, धर्माचे, मानवतेच्या दर्शनाचे व एकात्मतेचे प्रतीक आहे.

सरपंच सुप्रिया गावस म्हणाल्या, हिंदू धर्माचे नववर्ष म्हणजे गुढीपाडवा. अशा या कार्यक्रमांतून पुढील पिढीला संस्कार मिळतात. कोणत्याही शुभकार्याला आम्ही या दिवसापासून जास्तकरून सुरुवात करत असतो. उस्मान सय्यद यांनीही आपले विचार व्यक्त केले.

यावेळी मिरवणुकीवेळी वेशभूषा सादर केलेल्या मुलांना प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. तसेच श्री भूमिका संगीत विद्यालय पर्येचे अध्यक्ष संजय उसपकर व तोणयेश्वर रोमटामेळ पथकाच्या प्रतिनिधीला सन्मानचिन्ह देऊन गौरविले. सुरुवातीला सूर्यकांत माजिक यांनी स्वागत –प्रास्ताविक केले. समितीच्या कार्यकर्त्यांनी मान्यवरांचे फुलांनी स्वागत केले. निकिता गणु गावस हिने सूत्रसंचालन तर राघोबा पेडणेकर यांनी आभार मानले. तद्‌नंतर श्री भूमिका देवी संगीत विद्यालय पर्येतर्फे विद्याधर गोखले लिखित व शिवनाथ नाईक दिग्दर्शित 'संगीत सुवर्ण तुला' हा नाट्यप्रयोग झाला.